# प्रजातंतू

तैत्तिरीय उपनिषदाच्या शिक्षाध्यायामध्ये प्रजातंतूचा उल्लेख केलेला आहे. शिक्षण संपवून गृहस्थाश्रमांत प्रवेश करणाऱ्या शिष्याला गुरू सांगत आहेत, की प्रजातंतूचा विच्छेद होऊ देऊ नकोस. समाजधारणेसाठी हा फार महत्त्वाचा उपदेश आहे. प्रजातंतू म्हणजे फक्त विवाह करून प्रजा निर्माण करणे एवढेच नव्हे; तर वडीलधाऱ्यांबद्दल आदर, समवयस्कांबद्दल सख्य आणि पुढच्या पिढीबद्दल वात्सल्य, या तीन पिढ्यांना एकत्र बांधणाऱ्या भावनांचा त्यात अंतर्भाव आहे.

ज्या समाजामध्ये या भावनांची कदर केली जात नाही, त्या जोपासल्या जात नाहीत तो समाज कितीही समृद्ध असला तरी आतून पोखरला जाऊन नष्ट होईल. कर्तबगारी ही तरुण पिढीलाच गाजवायची असते. समृद्धी वाढवणं, ती समाजाच्या सर्व थरांत जाऊ शकेल हे पाहणं, एकंदर ज्ञान आणि कौशल्यात भर घालणं, मागच्या पिढीचा सांभाळ करणं, पुढच्या पिढीचं व्यवस्थित संगोपन

करून त्यांना समाजाची धुरा वाहायला लायक करणं अशा सर्व जबाबदाऱ्या या तरुण पिढीवरच असतात.

कुटुंबातल्या कर्त्या पुरुषावरच या जबाबदाऱ्या येऊन पडतात. म्हणून हा त्याला केलेला उपदेश आहे. आचार्य दादा धर्माधिकारी यांनी म्हटल्याप्रमाणे जगात सर्व कार्य तरुण पिढीच्या हातूनच घडत असतं.

वृद्धांकडे ज्ञानाचे आणि अनुभवाचे साठे असतात. त्यांचा योग्य तो प्रतिपाळ होऊन, ते साठे समाजापर्यंत पोहोचतील कसे, हे तरुण पिढीनेच पाहायचे आहे. त्या साठ्यांमध्ये आपण काय भर घालू शकू, पुढच्या पिढीला तो वारसा नीट जतन करून आणखी समृद्ध करून कसा देता येईल याचा विचारसुद्धा तरुणांनीच करायचा आहे.

आयुष्याच्या उंबरठ्यावर आपले पुढे काय होईल एवढाच कोता विचार करणारा तरुण समाजव्यवस्थेला पार रसातळाला नेईल. फक्त आपलाच नव्हे; तर कुटुंबातील सर्व घटकांचा आणि समाजाच्या उन्नतीचासुद्धा त्याला विचार करायला हवा. ही जाण मागच्या पिढीला तरुणांना करून देता आली पाहिजे आणि त्यांनी भविष्याचा विचार करताना हे भान सतत ठेवले पाहिजे.

यश, कीर्ती आणि समृद्धी ही आपल्या माणसांसाठी मिळवायची असतात. तुम्ही जितक्या जणांची जबाबदारी आपल्या खांद्यावर घ्याल, तितकी तुमची आपल्या म्हणवणाऱ्या माणसांची संख्या वाढेल. आपल्या स्वार्थाला मुरड घालता आली तरच आपले यश जास्त लोकांना स्वीकार करावेसे होईल. कीर्तीसुद्धा जाहिरातबाजी न करता येईल आणि समृद्धीचेही कौतुक जास्त लोकांकडून होईल. असं जर होणार नसेल तर या गोष्टी मिळवायच्याच कशाला ?

**– भीष्मराज बाम**

**('मना सज्जना' या पुस्तकातून)**